दिव्य मराठी बीड जिल्हा 14-02-2024

# 'योगेश्वरी'च्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाविषयक पुरस्कार



कमवा व शिका उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षा योजनेत सहभागी विद्यार्थी.

**प्रतिनिधी** | अंबाजोगाई

संगणक विभाग योगेश्वरी महाविद्यालय व ऑटिव्हायरस कंपनी क्विक हिल यांच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत योगेश्वरी महाविद्यालयास एकूण तीन पुरस्कार प्राप्त झाले. बेस्ट मीडिया आऊट रिच ह्या श्रेणीतील प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. यासह अभिषेक थळकरी, अपर्णा आटुळे यांना बेस्ट प्रोग्राम आऊट रिच अँड इम्पॅक्ट या श्रेणीतील उपविजेता पुरस्कार मिळाला. १० फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे येथे ह्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कमवा व शिका या योजनेचा भाग होता. ह्या योजनेमध्ये एकूण वीस विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यात अजय काळे, सोमेश्वर मुळे, ऋतुजा भोसले, गंगा आरडे, सोनाली चौरे, वैष्णवी महामुनी, महेश बेदरे, विशाल लाखे, श्रद्धा राऊत, साक्षी चौधरी, खरात सोना, डांगे दीपक, आरती कोलाहल, वैष्णवी देशमुख, अभिषेक थळकरी, अपर्णा आटुळे, धनंजय तरकसे, हर्षद रेनापुरे, निकिता आरडे,गायत्री बासटवार यांचा समावेश आहे. ह्या विद्यार्थ्यांनी विविध शाळा महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाविषयी माहिती देऊन उपायात्मक योजनेविषयी माहिती दिली. तसेच समाजातील विविध स्तर जसे बस चालक वाहक, ज्येष्ठ नागरिक, फेरीवाले, महिला पुरुष यांच्यासाठी विविध ऑनलाईन माध्यमातून व पथनाट्यातून जनजागृती केली. ऑक्टोबर महिना हा सायबर सेक्युरिटी मंथ म्हणून राबविण्यात आला. संगणक विभाग प्रमुख डॉ.आर.जी.जोशी, प्रा. ऋतुजा रामदासी यांनी शिक्षण समन्वयक म्हणून काम पाहिले. पुरस्कार प्राप्त विद्यार्थी व शिक्षकांचे प्राचार्य डॉ. व्ही बी साखरे व उपप्राचार्य डॉ.आर.व्ही. कुलकर्णी, अधीक्षक अजय चौधरी यांनी अभिनंदन केले.